**वाचले :-**

१.शासन निर्णय क्र.घभा/१००५/प्र.क्र.१३/सेवा-५दिनांक १७ जून २००५
२.शासन निणर्य क्र. वाहभ-२००९/प्र.क्र७८/ दिनांक ५ एप्रिल २०१०
३.आदेश क्र. लेखा/१/कावि/११८५/२००९ दिनांक २४/०८/२००९
४.महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र.वाहभ-२०१४/प्र.क्र.५/सेवा-५
दि.३ जून २०१४ व समक्रमांकाचे शासन शुध्दीप्रत्रक दि.०४ जून २०१४
५.मा.आयुक्त सो यांचेकडील दि. /०६/२०१४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८, लेखा विभाग
क्र.लेखा/१अ/कावि/४०८/२०१४
दि.२६/०६/२०१४

**विषय :- सुधारित दराने वाहतुक भत्ता मंजुरीबाबत**

**आदेश,**

महाराष्ट्र शासनाचे वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.वाहभ-२००९/प्र.क्र.७८/सेवा-५ दि.०५ एप्रिल २०१० नुसार सध्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील कर्मचा-यांना वाहतुक भत्ता अदा केला जात आहे. उपरोक्त वाचले क्र. ४ अन्वये दि.१ एप्रिल २०१४ पासून वाहतुक भत्याचे दरामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा केली आहे.

| अ.क्र | ग्रेड वेतन | दरमहा वाहतूक भत्याचा दर (रु) | |
|---|---|---|---|
| | | अ-१ आणि अ वर्ग शहरे | इतर ठिकाणे |
| ०१ | रु.५४००/- व त्याहुन अधिक | रु.२४००/- | रु.१२००/- |
| ०२ | रु.४४००/- व त्याहुन अधिक मात्र रु.५४००/- पेक्षा कमी | रु.१२००/- | रु.६००/- |
| ०३ | रु.४४००/-पेक्षा कमी | रु.४००/- | रु.४००/- |

तसेच अंध, अस्थिव्यंगाने अधु आणि कण्याच्या विकाराने पिडीत असणा-या राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचा-यांना सध्या अनुज्ञेय असणा-या वाहतुक भत्त्यामध्ये पुढील प्रमाणे वाढ करण्यात येत आहे.

| अ.क्र | ग्रेड वेतन | दरमहा वाहतूक भत्याचा दर (रु) | |
|---|---|---|---|
| | | अ-१ आणि अ वर्ग शहरे | इतर ठिकाणे |
| ०१ | रु.५४००/- व त्याहुन अधिक | रु.४८००/- | रु.२४००/- |
| ०२ | रु.४४००/- व त्याहुन अधिक मात्र रु.५४००/- पेक्षा कमी | रु.२४००/- | रु.२०००/- |
| ०३ | रु.४४००/-पेक्षा कमी | रु.२०००/- | रु.२०००/- |

उपरोक्त वाचले क्र.१ चे शासन निर्णयानुसार स्थानिक पुरक भत्त्यांचे प्रयोजनार्थ जे शहरांचे वर्गीकरण लागू आहे तेच वाहतुक भत्त्याचे प्रयोजनार्थ असलेबाबत उपरोक्त वाचले क्रमांक २ चे शासन निर्णयात नमूद केले आहे. उपरोक्त वाचले क्र. १ चे शासन निर्णयानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे वर्गीकरण **अ** वर्गात केले आहे

सबब, मी आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८ सदर आदेशान्वये सदर शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार महानगरपालिका कर्मचा-यांना सुधारित दराने वाहतुक भत्ता अदा करणेस मान्यता देत आहे. अंध, अस्थिव्यंगाने अधु आणि कण्याच्या विकाराने पिडीत असणा-या ज्या कर्मचा-यांना स्वतंत्र आदेशाने यापूर्वी वाहतुक भत्ता मंजूर केला आहे त्यांनाच उक्त शासन निर्णयातील नमूद दराने वाहतुक भत्ता अदा करणेत यावा. माहे एप्रिल २०१४ पासुन वाहतुक भत्याचा फरक माहे जुलै २०१४ चे वेतनात अदा करणेत यावा.

**आयुक्त** २७/६/१४
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८

प्रति,

सर्व सबंधित विभागप्रमुख/शाखाप्रमुख.

उपरोक्त शासन निर्णय महाराष्ट्र शासनाचे वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

प्रत –

प्रशासन / संगणक विभाग

२/- पगारबिल संगणक प्रणालीत नोंद घेणेकामी.